| MHKO070019342025 | **नियमीत दिवाणी दावा क्र.१९३/२०२५ मधील**<br>**नि.क्र.४४ खालील आदेश**<br>**(फिरोज जमाल नदाफ )**<br>**–विरुध्द–**<br>**(श्रीमती नन्नुबी जमाल नदाफ (पिंजारी) वगैरे )** |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.८ तर्फे संचालक ८/१ ते ८/४ यांनी त्यांची कैफियत सदर कामी सामील होणेसाठी दाखल केलेला आहे. त्यास वादी यांनी प्रस्तुत अर्जावरच त्यांचे म्हणणे देवून प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.५०००/– कॉस्ट वरती मंजूर करावा असे कथन केलेले आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.८/१ यांना दि.१९.११.२०२५ रोजी, प्रतिवादी क्र.८/४ यांना दि.२७.११.२०२५ रोजी, प्रतिवादी क्र.८/३ यांना दि.१७.११.२०२५ रोजी यांना समन्सची बजावणी झालेली आहे. तरी देखील त्यांनी मुदतीमध्ये त्यांची कैफियत दाखल केलेली नाही. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापनाबाबत, वाटपाबाबत व निरंतर मनाईबाबत दाखल केलेला आहे. सदरचा दावा अद्याप चौकशीला लागलेला नाही. प्रतिवादी यांच्या अर्जामध्ये नमुद कारणांचे अवलोकन करता सदरचे कारण हे समाधानकारक दिसून येत नाही. परंतु दाव्याच्या स्वरुपाचा व नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार करता प्रतिवादी यांना त्यांची केस ही कैफियतीच्या माध्यमातून मांडणेची संधी देणे योग्य व न्यायोचित वाटते. जर प्रतिवादी यांना त्यांची कैफियत दाखल करणेस परवानगी न दिलेस तर त्यांचा बचावाचा हक्क नाकारल्यासारखे होईल. शिवाय प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर घेतलेस प्रस्तुत वादी यांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. उलट प्रस्तुतच्या कैफियतीने दावा हा गुणदोषावर निर्णीत करणेसाठी उपयुक्त ठरणार आहे. परंतु त्याच बरोबरीने प्रतिवादी यांना कैफियत दाखल करणेस झालेला विलंब दुर्लक्षीत करत येणार नाही. सदर विलंबाची भरपाई प्रतिवादी यांचेवर योग्य तो खर्च आकारुन करणे न्यायोचित होईल. करिता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## – <u>आदेश</u> –

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.४४) रक्कम रु.५००/– च्या खर्चावरती मंजूर करण्यात येतो.

२. सदर खर्चाची रक्कम वादी यांना देणेत यावी. सदरची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी क्र.८/१ ते ८/४ यांची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

PATIL MAYUR SAMPAT

Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2026.03.25 17:35:31 +0530

दि.२५/०३/२०२६

**(एम. एस. पाटील )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर